क्र.३/नसवि/महासभा/ ०२ /२०१७-२०१८
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- २१ जून २०१७

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## महानगरपालिका सभा क्रमांक - ०२ /२०१७-२०१८

## महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ------------------------------------------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **मंगळवार दिनांक ०४/०७/२०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

21.6.17
**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

## परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.२०/०५/२०१७ रोजीची तहकूब सभा दि.२३/०५/२०१७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
   अ) दु:खवठ्याचे ठराव.
   ब) अभिनंदनाचे ठराव.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेंतर्गत सुधारीत व विस्तारीत नळ पाणी पुरवठा योजनेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग यांची सल्लागार म्हणून नियुक्ती करणे, योजनेकरीता २५% मनपा हिस्सा भरणे व योजना स्विकृतीकरीता महासभा ठराव क्र.१२० दि.३०/११/२०१६ अन्वये पारित करणेत आलेला आहे. त्यावर प्रशासनाकडून करणेत आलेल्या कार्यवाही बाबत चर्चा करुन निर्णय घेणे.

५. महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सर्वासाठी घरे-२०२२ या योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेत आलेला असून, त्यामधील लाभार्थींची निवड ही केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार व मनपाच्या निर्देशानुसार करणेत येणार आहे. त्यासाठी प्रस्तुत प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी व निर्णयार्थ आलेले **उपायुक्त (नादानिक) यांचे दि.१२/०६/२०१७ चे विषयपत्र.**

६. मिरज येथील कम्युनिटी हॉल राजर्षी शाहू शिक्षण संस्था या संस्थेला मासिक भाडे र.रु.१७२०७/- मात्र ९ वर्षे मुदतीकरीता भाड्याने देणे व दर तीन वर्षानी २०% भाडेवाढ करणेच्या अटीवर देणेबाबत वृत्तपत्रामध्ये जाहिर प्रसिद्धी करुन टेंडर मागविणेस व त्या अनुषंगाने येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.३१/१२/२०१६ चे विषयपत्र.**

७. महापालिका क्षेत्रातील सि.स.नं.३०३ ही जागा हरि विकास चॅरिटेबल ट्रस्ट,सांगली यांना बाग बगीचा विकसित करणेस ९ वर्षे मुदतवाढ देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.११/०५/२०१७ चे विषयपत्र.**

८. मिरज कृष्णा घाट येथील ग.नं.५९३/२ येथील अंदाजे १ एकर जमिनीमध्ये गवत व इतर वैरण पिके पिकविणेकरीता सन २०१७-१८ ते २०१९-२० या तीन वर्षाकरीता (त्रैवार्षिक) र.रु.६६,०००/- ते र.रु.७२,०००/- इतकी आधारभूत किंमत धरुन जाहिर लिलावाने जमिन वापरास देणेकामी **उपायुक्त (बांधकाम (उद्यान) विभाग) यांचे दि.१३/०१/२०१७ चे विषयपत्र.**

९. सांगली रिसाला रोड ते शाहू उद्यानाकडे जाणारा दक्षिणोत्तर ४० फुटी डी.पी.रस्ता रुंदीकरणा खालील बाधित क्षेत्राची कब्जेपट्टीद्वारे महापालिकेच्या ताब्यात घेणेबाबत व त्या ठिकाणचे मिळकतधारक यांनी ४० फुटी ऐवजी ३० फुट रुंदीने रस्ता करणेबाबत केलेल्या मागणीनुसार त्यावर धोरणात्मक निर्णय घेणेकामी **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.२५/०५/२०१७ चे विषयपत्र.**

१०. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

११. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०२/२०१७-१८

## महापालिका सभा दिनांक ०४/०७/२०१७ करीता.

मंगळवार दि.०४/०७/२०१७ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय, सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

**१. मा.पै.बाळासाहेब जगन्नाथ गोंधळे यांनी दिलेला प्रस्ताव:-**

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ५०८ बदली कर्मचारी कार्यरत आहेत. सदरचे बदली कर्मचारी गेले अनेक वर्षांपासून नगरपालिका ते महानगरपालिकेमध्ये आजपर्यंत बदली कार्डावर काम करीत आहेत. तसेच, ज्या बदली कर्मचाऱ्यांचे वारसांना व काही नातेवाईकांना पूर्वी बदली कार्ड देणेत आलेले आहेत.तसेच, त्यांनी एक वर्षाचे काम करुन बदली कार्डाचे वेतन घेतलेले आहेत. या सर्व बाबींचा विचार करुन महानगरपालिकेच्या आस्थापनेवर रितसर बदली कामगारांच्या वारसांना बदली कार्ड देवून पुर्ववत कामावर घेणेकामी आलेला प्रस्ताव

**२. मा.शेखर विश्वासराव माने यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील जुना स्टेशन चौक येथील अत्यंत जुने व जिर्ण झालेले व्यासपीठ व बस थांबा काढून नविन व्यासपीठ व नविन बस थांबा बांधून परिसर विकसीत करणेस, आराखडा तयार करणे व निविदा काढणेकामी येणारे अनुषंगिक खर्चास धोरणात्मक निर्णय घेवून मान्यता देणेकामी आलेला प्रस्ताव.

**३. मा.राजू लक्ष्मण गवळी यांनी दिलेला प्रस्ताव :-**

महासभा ठराव क्र.९१ दि.०१/०९/२०१६ अनवये श्री.एस.डी.मुळ व इतर ५ यांच्या वेतन श्रेणी सुधारीत होणेकामी मा.शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस मान्यता देणेत आलेली आहे. श्री.पी.व्ही.माने, श्री.सी.जी.सोणवणे व श्री.एस.बी.कमलेकर हे तीन सेवा निवृत्त अभियंते असून, त्यांची वेतन श्रेणी शासन निर्णय क्र.थेपूर १०१२/६२९/९६/आ (श.प्रा) मंत्रालय,मुंबई ४०००३२/शिबीर कार्यालय नागपूर दि.१४/१२/१९९६ च्या शासन निर्णयानुसार शासनाच्या सेवेत असणाऱ्या अभियंत्या प्रमाणेचे सुधारीत वेतन श्रेणी मंजूर होणेसाठीचा प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५१(४) अन्वये मा.शासनाकडे पाठविणेस मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव.

---

महापालिका सचिव कार्यालय,
महापालिका मुख्यालय, सांगली.
दिनांक : ०१/०७/२०१७.

महापालिका सचिव,
सांगली,मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- ०४/०७/२०१७

ठराव क्रमांक :- ३०

विषय क्रमांक :- ०१

---

मागील सर्वसाधारण महासभा दि.२०/०५/२०१७ रोजीची तहकूब सभा दि.२३/०५/२०१७ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.०१ ते ठराव क्र.२९ हे सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-
(मा.बाळाजी गोंधळी)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

मा. महासभा ठिकाण,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- ०४/०७/२०१७

ठराव क्रमांक :- 31

विषय क्रमांक :- ०२

## अभिनंदनाचा ठराव

महाराष्ट्र राज्यातील शेतकऱ्यांना कर्ज माफी दिल्याबद्दल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस यांचे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे

सूचक :- मा.युवराज सतिश बावडेकर

अनुमोदक :- मा.धनपाल तात्या खोत

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

प्रशासकीय अधिकारी

नगरसचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- ०४/०७/२०१७

ठराव क्रमांक :- ३२

विषय क्रमांक :- ०२

---

## अभिनंदनाचा ठराव

सद्या सुरु असलेल्या महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेमध्ये सांगलीची सुकन्या कु.स्मृती मानधना ही शतकी खेळी करीत भारतीय संघास विजय मिळवून देत आपल्या देशाचेच नव्हे तर आपल्या जिल्ह्याचेही नाव उज्वल केले आहे. तिच्या या यशाबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.प्रशांत विजयकुमार पाटील (मजलेकर)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

अनुमोदक :- मा.संतोष शिवदास पाटील

प्रशासकीय अधिकारी

महापालिका [illegible]

सांगली मिरज [illegible] महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- ०४/०७/२०१७

ठराव क्रमांक :- ३३

विषय क्रमांक :- ०४

केंद्र शासन पुरस्कृत अमृत अभियान योजनेंतर्गत प्रकल्पांचे डी.पी.आर (अंदाजपत्रक व आराखडे) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तयार केलेले आहेत. सुधारीत मिरज नळ पाणी पुरवठा योजना स्विकृतीस महासभा ठराव क्र.१२० दि.३०/११/२०१६ अन्वये यापूर्वीच मान्यता देणेत आलेली आहे. त्यामध्ये नमुद करणेत आलेल्या सुचनांपैकी खालील प्रमुख सुचनांचा समावेश आहे.

१) योजनेची मुदत दोन वर्षांकरीता असून, मुदतीत काम पूर्ण होणे आवश्यकच आहे. मुदतीत कामे पूर्ण न झाल्यास, त्याकरीता कोणतीही मुदतवाढ वा दरवाढ देण्यात येवू नये.

२) प्रस्तुत योजना सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पीय तरतुदी मधून व नागरीकांचे कडून होणाऱ्या कर वसूलीतून व पूर्णपणे महानगरपालिकेच्या मालकीची असल्याने सदर निविदा प्रक्रिया महासभेची मान्यतेने प्रस्तुत योजनेकरीता करण्यात येणारी निविदा प्रक्रिया राबविणे, त्यास मान्यता देणे व वर्क ऑर्डर, देयके तपासणे व आदा करणे इ.प्रक्रिया करावयाचे अधिकार महापालिकेकडे राहतील. त्यामध्ये महाराष्ट्र शासन अथवा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचा काहीही संबंध असणार नाही.

३) प्रस्तुत योजनेच्या टेंडर कामी अंदाजपत्रकापेक्षा जादा दराने निविदा मान्य करण्यात येवू नयेत.

४) महाराष्ट्र शासनाने, अंमलबजावणी यंत्रणा म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास नेमण्यास मान्यता दिली असल्यामुळे प्रकल्प व्यवस्थापन शुल्क म्हणून योजनेच्या ३% इतके शुल्क शासनाकडून आदा करण्यात यावे. त्याकरीता महापालिकेवर त्याचा भार देवू नये.

वरील प्रमाणे प्रमुख सूचना विचारात घेता व आता प्रस्तुत कामी प्रशासनाने कोणतीही प्रशासकीय मान्यता अगर पूर्व कल्पना न देता प्रस्तुत योजनेसाठी ई-निविदा प्रसिद्ध करुन, निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्रस्तुत अमृत अभियान अंतर्गत सुधारित मिरज पाणी पुरवठा योजनेच्या ८.१६% जादा दराचे निविदा स्विकृतीस मान्यता देणेकामी प्रशासनाने स्थायी समितीकडे विषयपत्र सादर केलेनुसार स्थायी समिती ठराव क्र.६७ दि.२८/०६/२०१७ अन्वये खालील मुद्दयावर मा.शासनाकडून सविस्तर माहिती उपलब्ध करुन घेवून, ती स्थायी समिती समोर सत्वर सादर करणेत यावी असे आदेशित केले असून, दरम्यानच्या कालावधीत प्रस्तुतचा विषय प्रलंबित ठेवणेत आलेला आहे.

१. महासभा ठराव क्र.१२० दि.३०/११/२०१६ अन्वये, प्रस्तुत कामी अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराची निविदा मान्य करणेत येवू नये असे धोरण निश्चित करणेत आलेले आहे. परंतु, शासनाकडून व महापालिका प्रशासनाकडून उक्त जादा दराची निविदा मान्य केलेमुळे महासभेच्या ठरावाचे उल्लंघन होणार आहे. तसेच, जादा होणारा खर्च शासन अनुदानातून होणार आहे की महापालिकेवर आर्थिक बोजा पडणार आहे याबाबत शासनाकडून मार्गदर्शन मागवून घेणे योग्य होईल. ते प्रशासनाने तात्काळ उपलब्ध करुन घ्यावे.

२. या प्रकरणात अंमलबजावणी यंत्रणा म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास नेमण्यास मान्यता दिली असल्यामुळे प्रकल्प व्यवस्थापन शुल्क म्हणून योजनेच्या ३% इतके शुल्क शासनाकडून आदा करणेबाबत उक्त ठरावामध्ये नमुद करणेत आलेले आहे ही बाब शासनाने मान्य केली आहे किंवा कसे? याबाबत माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे.

... २ ...

३. निविदा प्रक्रिया करत असताना नव्याने सुरु होणाऱ्या GST कराबाबत भविष्यात पडणारा वाढीव बोजा ठेकेदारावर राहणार आहे की महापालिकेवर पडणार आहे याबाबतचा उहापोह कोठेही नमुद नाही. तो होणे आवश्यक आहे.

४. विषयपत्रासोबत मक्तेदाराने, सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नवी मुंबई यांना दि.१९/०६/२०१७ रोजीच्या दिलेल्या पत्रामध्ये "महापालिकेस बिल सादर झाल्यानंतर सदर बिलाची आदायगी महापालिकेच्या थेट लेखा शाखेला जावून जास्तीत जास्त १५ दिवसात आदायगी होईल. १५ दिवसानंतर होणाऱ्या विलंबासाठी व्याजाची आदायगी होईल." ही अट शासनाकडून मान्य करणेत आली आहे अगर कसे? याबाबत सविस्तर तपशिल प्राप्त होणे आवश्यक आहे.

वरील प्रमाणे महासभा ठराव क्र.१२० व स्थायी समिती ठराव क्र.६७ वर सभागृहात सविस्तर चर्चा होवून, सभागृहात खालील नमुद केलेल्या मुदयावर चर्चा करण्यात आली.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५१ अन्वये **विवक्षित प्रकरणांमध्ये महानगरपालिकेचा किंवा इतर प्राधिकाऱ्यांचा कोणताही ठराव किंवा आदेश निलंबित किंवा विखंडीत करण्याचा राज्या शासनाचा अधिकार** मधील (१) महानगरपालिकेच्या किंवा इतर कोणत्याही प्राधिकाऱ्याच्या कोणत्याही ठरावाचे किंवा आदेशांचे कार्यान्वियन केल्याने किंवा अधिनियम किंवा त्यावेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा याद्वारे किंवा तदन्वये देण्यात आलेल्या अधिकाऱ्याच्या विरुद्ध किंवा मर्यादेबाहेर आहे किंवा शांततेचा भंग होण्याचा संभव आहे किंवा लोकहिताविरुद्ध नगरपालिका निधीचा दुरुपयोग किंवा गैरवापर किंवा अपव्यय होण्याचा संभव आहे (किंवा ते महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या अथवा व्यापक लोकहिताच्या विरुद्ध आहे) असे राज्य शासनाचे मत झाल्यास, राज्य शासनास लेखी आदेशाद्वारे अशा ठरावाचे किंवा आदेशाचे कार्यान्वयन, त्यामध्ये ते विनिर्दिष्ट करील अशा मुदतीसाठी किंवा मुदतीसाठी निलंबित करता येईल किंवा अशी कोणतीही कृती करण्यास मनाई करता येईल अशा आदेशाची एक प्रत. राज्य शासनाने महानगरपालिकेस व आयुक्तास व परिवहन व्यवस्थापकास ताबडतोब पाठविली पाहिजे.

(१) या तरतुदीन्वये उपरोक्त महासभेचा ठराव अथवा आदेशाविरुद्ध महानगरपालिकेने राज्य शासनाकडे अभिवेदन केलेले नसल्यामुळे अधिनियमातील कलम ४५१ अन्वये विखंडीत करणेत आलेला नाही. त्यामुळे ठरावावरील करण्यात आलेल्या कार्यवाहीवर चर्चा करुन त्यावर निर्णय घेणेचा अधिकार या सभेस प्राप्त आहेत.

(२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३५-अ अन्वये **महानगरपालिकेने कोणत्याही समितीच्या अधिकारांचा वापर करणे व तिची कर्तव्ये पार पाडणे.**- जर, या अधिनियमाखालील कोणतीही समिती किंवा विशेष समिती कोणत्याही वेळी घटित केली नसेल, किंवा ती कोणत्याही कारणामुळे या अधिनियमाखालील आपल्या अधिकारांचा वापर करण्याच्या किंवा आपली कर्तव्ये पार पाडण्याच्या स्थितीत नसेल तर, अशी समिती घटित करण्यात येईपर्यंत किंवा आपल्या अधिकारांचा वापर करण्याच्या किंवा आपली कर्तव्ये पार पाडण्याच्या स्थितीत येईपर्यंत, महानगरपालिका समितीच्या अधिकारांचा वापर करीत आणि तिची कर्तव्ये पार पाडील अशी तरतुद असल्याने, महासभेने ठराव क्र.१२० दि.३०/११/२०१६ अन्वये पारित केलेला ठराव हा जरी महासभेचा असला तरी, त्यावेळी स्थायी समिती अस्तित्वात नसल्यामुळे, निविदेबाबत ठरावात नमुद मुद्दे हे कायद्याने योग्य व बरोबर आहेत.

त्यामुळे तो ठराव स्थायी समितीचा देखील असल्याचे सकृत दर्शनी सिद्ध होत आहे. त्यामुळे स्थायी समितीने व महापालिका प्रशासनाने इथून पुढील काळात या ठरावाचे तंतोतंत पालन करणे विधीवत होईल असे या सभेचे स्पष्ट मत आहे. त्यामुळे अंदाजपत्रकीय दरापेक्षा जादा दराची निविदा त्यांना मान्य करावयाचे झालेस, त्यासाठी उपरोक्त ठरावात दुरुस्ती करणे क्रमप्राप्त होणार आहे.

(३) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभा कामकाज मधील कलम १(२) विचारात घेता, **ठराव पारित झाल्यानंतर त्यामध्ये एकूण पालिका सदस्यांपैकी एक द्वितीअंश किंवा आवश्यक असेल अशा अधिक संख्येइतक्या सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या आणि सभेत संमत झालेल्या ठरावाने फेरबदल करता येईल** ही तरतुद विचारात घेता प्रस्तुत ठरावात कोणताही फेरबदल आज अखेर केलेला नाही.

उक्त तिन्ही मुद्दे विचारात घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

(१) शहरा लगतच्याच इचलकरंजी नगरपालिकेत प्रस्तुत योजनेसाठी मार्गावणेत आलेल्या निविदांमध्ये अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे ही बाब विचारात घेता व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ व प्रकरण ५ संविदा या तरतुदीन्वये प्रशासनाकडून विहित पद्धतीने निविदा प्रक्रियेचा अवलंब न करता परस्पर प्रशासनाने मान्यतेसाठी सादर केलेल्या अमृत अभियान अंतर्गत सुधारित मिरज पाणी पुरवठा योजनेच्या ८.१६% जादा दराचे निविदेस स्थायी समितीने मान्यता देवू नये असे ही सभा अधिनियमातील नियम ४ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारात सर्वोच्च प्राधिकरण म्हणून आदेशित करीत आहे.

(२) प्राप्त झालेली जादा दराची निविदा मान्य करावयाची नसल्याने, प्रस्तुत कामगिरीसाठी फेर निविदा काढणेत येवून, त्यामध्ये सिव्हील वर्क व पाईप लाईनसाठी दोन वेगवेगळ्या निविदा, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीअन्वये आवश्यक असणाऱ्या स्थायी समितीच्या मान्यतेने प्रसिद्ध कराव्यात. त्यासाठी आवश्यकती कार्यवाही प्रशासनाने ठेवणेत यावी.

उपरोक्त ठरावाचे वेळी सौ.संगिता हारगे यांनी सभागृहात त्यांचेसहीत १६ सदस्यांचा विरोध असलेबाबतचे पत्र मा.महापौर यांना सादर केले. परंतु, सभागृहात चर्चेच्या वेळी उपस्थित सदस्यांपैकी आसन स्थानावरुन उठून सौ.हारगे यांचेव्यतिरिक्त कोणीही विरोध केला नसल्यामुळे, प्रस्तुत मांडणेत आलेल्या ठरावास सौ.संगिता हारगे यांचा एकट्यांचा विरोध नोंदविणेत येवून, सदरचा ठराव १ विरुद्ध ६९ मतांनी असा बहूमताने मंजर करणेत येत आहे.

सूचक :- [signature]
(मा. पांडूरंग भिसे)

अनुमोदक :- [signature]
(मा. बाळासो गोंधळे)

ठराव बहूमताने मंजूर
[signature]
महापौर,

पाणीपुरवठा अभियंता,

विषयपत्रिकाने पारित झालेला ठराव, मा. आयुक्त यांचे निदर्शनास आणुन पुढील कार्यवाही ठेवणेत यावी.

[signature]
महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०२** दिनांक :- ०४/०७/२०१७

ठराव क्रमांक :- ३४

विषय क्रमांक :- ०५

---

सोबतचे उपायुक्त (नादानिक) यांचे दि.१२/०६/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सर्वांसाठी घरे-२०२२ या योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेत आलेला असून, त्यामधील लाभार्थींची निवड ही केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार व मनपाच्या निर्देशानुसार करणेत येणार आहे. त्यासाठी प्रस्तुत प्रस्तावास मान्यता मिळणेसाठी व निर्णयार्थ प्रस्ताव सादर करणेत आला आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत सर्वांसाठी घरे २०२२ ही केंद्र शासनाची योजना लागू करणेत आली असून, सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी होणेसाठी योजनेच्या अनुषंगाने सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन तो राज्यस्तरीय व संनियंत्रण समितीची मान्यता घेवून, केंद्रीय व संनियंत्रण समितीकडे मान्यतेस्तव सादर करणेचे आहे. तसेच, सदरचा प्रस्ताव थेट म्हाडास सादर न करता म्हाडाच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या कार्यालयास प्रथम सादर करणेस मा.मुख्य अभियंता - २ तथा राज्यस्तरीय सुकाणू अधिकारी प्रधानमंत्री आवास योजना,महाराष्ट्र यांनी लेखी कळविलेले आहे.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रधानमंत्री आवास योजना सर्वांसाठी घरे २०२२ ही योजना प्रभावीपणे राबविणेसाठी प्रस्तुत योजनेतील मार्गदर्शक सूचना व आदेशानुसार सूचनांचे पालन करुन चार व्हर्टीकल घटकांतर्गत समाविष्ठ होणाऱ्या विविध ठिकाणच्या लाभार्थींचा समावेश करुन सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणे आवश्यक असल्याने, त्यामध्ये लाभार्थी निश्चिती करणे, त्यांचे पात्रता निकष तपासणे,विविध प्र.पत्रे भरणे व ऑनलाईन माहिती भरुन घेणे व ती माहिती वेबसाईट वर प्रसिद्ध करणे तसेच, सविस्तर प्रकल्प अहवाल इ. अनुषंगिक कामे खाजगी सल्लागार एजन्सीकडून करवून घेणेसाठी दाराशॉ ॲन्ड कंपनी मुंबई यांची नियुक्ती मा.स्थायी समिती ठराव क्र.३ दि.०७/०४/२०१७ अन्वये मान्यता देणेत आलेली आहे.

त्यानुसार सांगली शहरातील स.नं.११७/३ सर्किट हाऊस पिछाडीस मा.आयुक्त नविन इमारती लगत EWS साठी २५२ घरकुले बांधणे अंदाजित र.रु.२६,३७,४९,६००/- (पार्किंग + ३ मजले. एका इमारतीमध्ये १८ फ्लॅट अशा १४ इमारती (पाणी पुरवठा;जलनि:सारण,प्लंबिग,विद्युत व लॅन्ड कॉस्टसह) मात्र रक्कमेचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेत आलेला असून, त्यास मान्यता मिळणेस प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. त्यास अनुसरुन सभागृहात सविस्तर चर्चा होवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेणेत येत आहे.

प्रस्तावित प्रकल्प अहवाल मा.शासनाकडे सादर करणेस ही सभा मान्यता देत असून, त्यातील प्रस्तावित जागेवर प्रकल्प न करता महानगरपालिका हद्दीतील शासन मालकीच्या जागेवर प्रकल्प करणेबाबतचा सविस्तर अहवाल प्रशासनाने सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक -

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

अनुमोदक -
(मा. ... )

शहर अभियंता (नागरिक)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०२** दिनांक :- ०४/०७/२०१७

ठराव क्रमांक :- ३५

विषय क्रमांक :- ०६

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.३१/१२/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मिरज येथील कम्युनिटी हॉल राजर्षी शाहू शिक्षण संस्था या संस्थेला मासिक भाडे र.रु.१७२०७/- मात्र ९ वर्षे मुदतीकरीता भाड्याने देणे व दर तीन वर्षानी २०% भाडवाढ करणेच्या अटीवर देणेबाबत वृत्तपत्रामध्ये जाहिर प्रसिद्धी करुन टेंडर मागविणेस व त्या अनुषंगाने येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत विषयांकीत प्रस्ताव सादर करणेत आला आहे. प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार सदरचा प्रस्ताव ही सभा तुर्त प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :- (मा. बाळासो गोंधळे)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

मालमत्ता व्यवस्थापक

बहुउद्देशिय ... 
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०२** दिनांक :- ०४/०७/२०१७

ठराव क्रमांक :- ३६

विषय क्रमांक :- ०७

---

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.११/०५/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिका क्षेत्रातील सि.स.नं.३०३ ही जागा हरि विकास चॅरिटेबल ट्रस्ट,सांगली यांना बाग बगीचा विकसित करणेस ९ वर्षे मुदतवाढ देणेकामी विषयांकीत प्रस्ताव सादर करणेत आला आहे. प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार सदरचा प्रस्ताव ही सभा तुर्त प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

अनुमोदक :-

(मा.बाळासो ?)

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका ...

सांगली मिरज कुपवाड ... पालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०२** दिनांक :- ०४/०७/२०१७

ठराव क्रमांक :- ३८

विषय क्रमांक :- ०८

---

सोबतचे उपायुक्त (बांधकाम (उद्यान) विभाग) यांचे दि.१३/०१/२०१७ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मिरज कृष्णा घाट येथील ग.नं.५९३/२ येथील अंदाजे १ एकर जमिनीमध्ये गवत व इतर वैरण पिके पिकविणेकरीता सन २०१७-१८ ते २०१९-२० या तीन वर्षाकरीता (त्रैवार्षिक) र.रु.६६,०००/- ते र.रु.७२,०००/- इतकी आधारभूत किंमत धरुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील मालमत्ता विनियोग ७९(क) नुसार जाहिर लिलावाने जमिन वापरास देणेस तसेच, सदर लिलाव प्रक्रिया आयुक्तसो यांचे मान्यतेने पूर्ण करणेस व जाहिर लिलाव नोटीस प्रसिध्दीचे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

अनुमोदक :-

(मा.-व्याकळी गोंधळे)

शहर अभियंता (उद्यान)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०२** दिनांक :- ०४/०७/२०१७

ठराव क्रमांक :- ३८

विषय क्रमांक :- ०९

---

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.२५/०५/२०१७ विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली रिसाला रोड ते शाहू उद्यानाकडे जाणारा दक्षिणोत्तर ४० फुटी डी.पी.रस्ता रुंदीकरणा खालील बाधित क्षेत्राची कब्जेपट्टीद्वारे महापालिकेच्या ताब्यात घेणेबाबत व त्या ठिकाणचे मिळकतधारक यांनी ४० फुटी ऐवजी ३० फुट रुंदीने रस्ता करणेबाबत केलेल्या मागणीनुसार त्यावर धोरणात्मक निर्णय घेणेकामी विषयांकीत प्रस्ताव सादर करणेत आला आहे. प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली रिसाला रोड ते शाहू उद्यानाकडे जाणारा दक्षिणोत्तर ४० फुटी डी.पी.रस्ता रुंदीकरण केल्यास त्यामध्ये बाधित होणाऱ्या संबंधीत मिळकतधारक यांची मिळकती काही प्रमाणात शिल्लक राहून, सदर मिळकतधारकांना निवाऱ्यास मुकावे लागणार आहे. यासाठी संबंधीत मिळकतधारक यांचे मागणीनुसार मानवतेचा दृष्टीकोन ठेवून, ४० फुटी ऐवजी ३० फुट रुंदीने रस्ता करणे उचित होईल असे या सभेचे मत असून, सांगली रिसाला रोड ते शाहू उद्यानाकडे जाणारा दक्षिणोत्तर ४० फुटी डी.पी.रस्त्या ऐवजी ३० फुट रुंदीने जागा संपादन करुन रस्ता करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (मा. युवराज गायकवाड)

अनुमोदक :- (मा. संतोष पाटील)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सहा-संचालक (न.र.)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- ०४/०७/२०१७

ठराव क्रमांक :- ३९

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील तरतुदीनुसार ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज शहरातील मिरज हायस्कूल मिरज असून या शाळेचे पटांगण श्री.किशोर दादासो जामदार यांनी त्यांचे मुलीचे विवाह निमित्त दि.११ ऑगस्ट २०१७ व दि.१२ ऑगस्ट २०१७ रोजी भाड्याने मिळणेस तसेच, मिरज हायस्कूल मिरजचे ग्राऊंडच्या दक्षिण बाजूची असणारी भिंत २० फुट खोलून पून्हा ती आहे त्या स्थितीत उभी करुन देवू असे दि.०१/०७/२०१७ रोजीचे पत्रान्वये मागणी केली असून, त्याचे होणारे भाडे भरण्यास तयार असलेचे कळविले आहे. त्यानुसार श्री.किशोर दादासो जामदार यांचे मागणी प्रमाणे मिरज हायस्कूल मिरजचे ग्राऊंडच्या दक्षिण बाजूची असणारी भिंत २० फुट खोलून पून्हा ती आहे त्या स्थितीत उभी करुन देणेच्या अटीवर मिरज हायस्कूल मिरजचे पटांगण दि.११ ऑगस्ट २०१७ व दि.१२ ऑगस्ट २०१७ रोजी मुलीचे विवाह निमित्त नियमाप्रमाणे भाडे भरुन घेऊन, भाड्याने देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- ०४/०७/२०१७

ठराव क्रमांक :- ४०

विषय क्रमांक :- सूचना

सोबतची श्री.संतोष शिवदास पाटील यांनी दिलेली सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील तरतुदीनुसार ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

श्री.संतोष शिवदास पाटील यांनी खंड १(ज) अन्वये दिलेल्या प्रस्तावावर महासभा ठराव क्र.६७ दि.१९/०७/२०१६ अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील ६० फुट रुंदीवरील नविन रस्ते व रस्त्याचे दोन्ही बाजूस गटारी व महत्वाचे नाले बांधणेसाठी महाराष्ट्र नगरोत्थान योजनेतुन निधी प्राप्त होणेसाठी शासनाकडे प्रकल्प अहवाल सादर करणे करीता नगररचना विभागाकडून विकास योजना आराखडयानुसार महत्वाचे प्रमुख रहदारीचे व विस्तारीत भागाचा विकास होणेस सुलभ होतील असे ६० फुट, ८० फुट व १०० फुट रुंदीचे रस्ते संबधीत सल्लागार यांचेशी चर्चा करुन एकुण ३८ रस्त्यांची यादी तयार करणेत येवून, सदर योजनेतंर्गत महापालिकेस सर्व साधारण २०० ते २५० कोटी इतका निधी मंजूर होवू शकेल यासाठी महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक सुनिअ २०१०/ प्रक्र.५१०/पापु-२२ दिनांक २२ फेब्रुवारी २०११ परिशिष्ठ २ भांडवली कामाचे अनुज्ञेय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवाशुल्क तक्त्यातील अ.क्र.७ नुसार १०० कोटी रक्कमेचे प्रकल्प खर्चा पुढील कामास शेकडा २.५०% सेवाशुल्क सदर योजना मंजूर झाल्यानंतर व योजनेसाठीचा निधी महापालिकेस प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण होवून कामाची बिले आदा करतेवेळी शेकडा २.५०% सेवाशुल्क आदा करणेत येईल या अटीवर सी.व्ही.कांड कन्सलटंन्स् पुणे व प्रायमुव्ह इफ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट इंजिनिअरिंग कन्सलटंन्स् पुणे यांची नियुक्ती करणेस मान्यता देणेत आली होती. सदर महासभा ठराव क्र.६७ दि.१९/०७/२०१६ अन्वये पारित करणेत आलेल्या ठरावामधील परिच्छेद क्र.तीन मध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सदर योजनेतंर्गत महापालिकेस सर्व साधारण २०० ते २५० कोटी इतका निधी मंजूर होवू शकेल यासाठी महाराष्ट्र शासन पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रमांक सुनिअ २०१०/ प्रक्र.५१०/पापु-२२ दिनांक २२ फेब्रुवारी २०११ परिशिष्ठ २ भांडवली कामाचे अनुज्ञेय प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवाशुल्क तक्त्यातील अ.क्र.७ नुसार १०० कोटी रक्कमेचे प्रकल्प खर्चा पुढील कामास शेकडा २.५०% सेवाशुल्क सदर योजना शासनाकडून मंजूर होवून जेवढा निधी महापालिकेस प्राप्त होईल. तेवढ्या रक्कमेच्या कामा पोटी करारपत्रातील टप्प्यानुसार शेकडा २.५०% सल्लागार शुल्क व सेवाशुल्क आदा करणेत येईल या अटीवर सी.व्ही.कांड कन्सलटंन्स् पुणे व प्रायमुव्ह इफ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट इंजिनिअरिंग कन्सलटंन्स् पुणे यांची नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (संतोष पाटील) ठराव सर्वानुमते मंजूर

अनुमोदक :- (धनपाल खोत) महापौर

अभियंता,
व. मा- श्री ... यांचे
... पुढील कार्यवाही
...

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- ०४/०७/२०१७

ठराव क्रमांक :- ७१

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य पै.बाळासाहेब जगन्नाथ गोंधळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर ५०८ बदली कर्मचारी कार्यरत आहेत. सदरचे बदली कर्मचारी गेले अनेक वर्षापासून नगरपालिका ते महानगरपालिकेमध्ये आजपर्यंत बदली कार्डावर काम करीत आहेत. तसेच, ज्या बदली कर्मचाऱ्यांचे वारसांना व काही नातेवाईकांना पूर्वी बदली कार्ड देणेत आलेले आहेत.तसेच, त्यांनी एक वर्षाचे काम करुन बदली कार्डाचे वेतन घेतलेले आहेत. या सर्व बाबींचा विचार करुन महानगरपालिकेच्या आस्थापनेवर रितसर बदली कामगारांच्या वारसांना बदली कार्ड देवून पुर्ववत कामावर घेणेकामी आलेल्या प्रस्तावावर प्रशासनाने सविस्तर अहवाल व विषयपत्र सादर करणेत यावे असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- (बाळासाहेब गोंधळे)

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (जगन्नाथ बापू ठोकळे)

महापौर,

प्रशासन निर्णय-(आस्था)

नगरपालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- ०४/०७/२०१७

ठराव क्रमांक :- ४२

विषय क्रमांक :- १(ज)

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य शेखर विश्वासराव माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली येथील जुना स्टेशन चौक येथील अत्यंत जुने व जिर्ण झालेले व्यासपीठ व बस थांबा काढून नविन व्यासपीठ उभा करणेस व नविन बस थांबा बांधून परिसर विकसीत करणेकामी आराखडे व अंदाजपत्रक तयार करणेस तसेच, रितसर निविदा प्रसिद्ध करुन,निविदा मागविणेस व त्याकामी येणारे अनुषंगिक खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- (मा. ... )

महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०२ दिनांक :- ०४/०७/२०१७

ठराव क्रमांक :- ४३

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा:सदस्य श्री.राजू लक्ष्मण गवळी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महासभा ठराव क्र.९१ दि.०१/०९/२०१६ अनवये श्री.एस.डी.मुळे व इतर ५ यांच्या वेतने श्रेणी सुधारीत होणेकामी मा.शासनाकडे प्रस्ताव पाठविणेस मान्यता देणेत आलेली आहे. श्री.पी.व्ही.माने, श्री.सी.जी.सोनवणे व श्री.एस.बी.कमलेकर हे तीन सेवा निवृत्त अभियंते असून, त्यांची वेतन श्रेणी शासन निर्णय क्र.थेपूर १०१२/६२९/९२/आ (श.प्रा) मंत्रालय,मुंबई ४०००३२/शिबीर कार्यालय नागपूर दि.१४/१२/१९९६ च्या शासन निर्णयानुसार शासनाच्या सेवेत असणाऱ्या अभियंत्या प्रमाणेचे सुधारीत वेतन श्रेणी निश्चिती करुन मागील कोणताही आर्थिक लाभ प्रत्यक्षात न देता केवळ वेतन निश्चिती त्या त्या दिनांकापासून करुन त्यानुसार वेतन श्रेणी लागु करणेस मा.शासन मान्यतेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ (४) अन्वये मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- (मा.किशोर जामदार)

अनुमोदक :- (मा.आनंदा गोंधळे)

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

प्रशासन अधिकारी (शिक्षण)

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.